स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, विष्णुपूरी, नांदेड.

सामाजिकशास्त्र विद्याशाखेच्या भूगोल विषयात
विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीच्या
नोंदणीसाठीचा आराखडा

*** संशोधनाचा विषय ***

“परभणी जिल्ह्यातील पर्यटन स्थळांचा भौगोलिक अभ्यास”

(A Geographical Study of Tourism
Places of Parbhani District)
(सन 1990 ते 2010)

संशोधक विद्यार्थी

शिंदे दत्ता राधकिसन

(एम.ए.एम.एड्. एम.फिल)

संशोधक मार्गदर्शक

डॉ. शिंदे सुनिता शंकरराव

भूगोल विभागप्रमुख,

श्रीमती सुशीलादेवी देशमुख,

महिला महाविद्यालय, लातूर ता.जि. लातूर.

सन २०१५-१६

“परभणी जिल्ह्यातील पर्यटन स्थळांचा भौगोलिक अभ्यास”
(A Geographical Study of Tourism Places of Parbhani District)

प्रस्तावनाः-

जगातील प्रमख व्यवसायापैकी शेती-उद्योग हे महत्त्वाचे व्यवसाय आहेत. उद्योग व्यवसायामध्ये अनेक व्यवसायांचा समावेश होता. त्यापैकीच पर्यटन हा एक व्यवसाय आहे.

पर्यटन हा जगातील एक प्रमुख व्यवसाय झाला आहे. या व्यवसायाचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत चालेले आहे. हा व्यवसाय पूर्णतः निसर्गावर तसेच ऐतिहासिक व सांस्कृतिक घटकांवर अवलंबून आहे. जगातील बऱ्याच देशात प्रेक्षाणीय स्थळे आहेत व ते मानवास आपल्याकडे आकर्षीत करतात. कारण मानव आपल्या जीवनातील काही वेळ हा विरंगुळा म्हणून पर्यटनामध्ये आनंद व उत्साहासाठी घालवतो. त्यामुळे मानवाला उत्साहीत वाटते. म्हणून पर्यटनस्थळांना व पर्यटकांला जगात आज फार महत्व आले आहे. जगातील प्रमुख देशापैकी भारत हा एक देश पर्यटनामध्ये प्रमुख देश म्हणून ओळखला जातो. कारण कोणत्याही देशाची ओळख ही त्या देशाच्या प्राकृतीक व नैसर्गीक रचनेवर आवलंबून असते.

भारताचे सर्वसामान्य हवामान मोसमी प्रकारचे असले तरी प्रदेशानुसार हवामानात भिन्नता आढळते. देशाचा आफाट विस्तार, मैदानी, पठारी व पर्वतीय प्रदेश, समुद्रकिनारा इ. मुळे भारतात प्रदेशानुसार हवामानात फरक दिसून येतो. उदा. जम्मुकाश्मीर व हिमाचल प्रदेशाचे हवामन थंड, राजस्थानचे हवामान उष्ण, केरळ, तामिळनाडू व दक्षिण कर्नाटकचे हवामान उष्ण व दमट आहे. भारतात कमी व जास्त पर्जन्याची तसेच कमी जास्त तापमानाची ठिकाणे आढळतात. अशाप्रकारे हवामानाच्या भिन्नतेमुळे भारतात पर्यटनाच्या विकासाला मदत झाली. उदा. जम्मुकाश्मीर व हिमाचल प्रदेश, तसेच उत्तरप्रदेश, पाश्चिम बंगाल, महाराष्ट्र, तामिळनाडू इ. राज्यात जास्त उंचीवरील ठिकाणे थंड हवामानामुळे त्याचप्रमाणे आसाम, नागालॅड, महाराष्ट्र (कोकण) इ. राज्यात जास्त पर्जन्याच्या क्षेत्रात पर्यटनाचा विकास झाला आहे.

पर्यटनाच्या दृष्टीने भारताची भुरचना महत्त्वाची आहे. भारताचा बराच मोठा भाग पर्वतरांगा, गिरिशिखरे, घाट, खिंड आणि दऱ्याखोऱ्यांनी व्यापलेला आहे. यात हिमालय विंध्य सातपुडा,

अरवली, सह्याद्री, निलगिरी इ. पर्वतीय क्षेत्रांचा समावेश होतो. भारतातील हे सर्व पर्वत तेथील घाट व दऱ्याखोऱ्या, दाट जंगलांनी आच्छादलेले आहेत.

भारताच्या तिन्ही बाजूला समुद्र आहे. भारताच्या किनाऱ्यावर नारळ, पाम, सुपारी व इतर विविध वृक्ष आढळतात. किनाऱ्यावर ठिकठिकाणी वाळूचे संचयन आढळते. अनेक ठिकाणी समुद्र पोहण्यासाठी चांगला आहे. ह्या सर्व गोष्टी पर्यटकांना मोठी आकर्षणे आहेत. अरबी समुद्र, बंगालच्या उपसागरात भारताच्या मालकिची अनेक बेटे आहेत.

भारतातील पर्यटनावर देशातील निरनिराळ्या जलाशयांचा परिणाम झाला आहे. नद्या, त्यांची उगमस्थाने, त्यांनी निर्माण केलेल्या दऱ्या व धळ्या, धबधबे व त्यांची मुखे, खाऱ्या व गोड्या पाण्याची सरोवरे, उष्ण व थंड पाण्याचे झरे व उष्णदोकाचे फवारे पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वाची असतात. भारतात या जलाशयांच्या ठिकाणी पर्यटनाचा मोठा विकास झाला आहे. पर्यटनात जम्मु काश्मीर, हिमाचल प्रदेश, गोवा, उत्तरांचल, महाराष्ट्र ही राज्य आग्रेसर आहेत.

महाराष्ट्र राज्य हे भारतातील विकसित राज्य असून येथे उद्योग धंद्याचा विकास भारतात सर्वाधिक झालेला आहे. पर्यटन विकासाच्या दृष्टीने या राज्याला ऐतिहासिक, सांस्कृतिक, धार्मिक परंपरा लाभलेली आहे. याशिवाय नैसर्गिक सृष्टीसौंदर्य स्थळे, थंड हवेची ठिकाणे यांचाही विकास झालेला आहे. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाची स्थापना इ.स. १९७५ मध्ये करण्यात आल्यानंतर खऱ्या अर्थाने पर्यटनाला चालना मिळाली. महाराष्ट्रात पर्यटन स्थळामध्ये कमालीची विविधता आहे. महाराष्ट्रात पर्यटन व्यवसायाचे भवितव्य अतिशय उज्वल आहे.

महाराष्ट्रातील भौगोलिक परिस्थिती, प्राकृतिक रचना, हवामान, जंगले, वन्य पशुपक्षी, जलाशय तसेच ऐतिहासिक, सांस्कृतिक व धार्मिक घटक पर्यटनास अनुकूल आहेत. त्यामुळे महाराष्ट्रात पर्यटनाचा विकास झालेला आहे. महाराष्ट्रात अजिंठा, वेरूळ, एलिफंटा यासारखी जागतिक किर्तीची लेणी, शिल्पे, पुणे, औरंगाबाद, सातारा, कोल्हापूर यासारखी ऐतिहासिक नगरे येथे आहेत. धार्मिक स्थळात, महाराष्ट्राची आध्यात्मिक राजधानी असलेले पंढरपूर, शिर्डी, शेगाव, तुळजापूर, कोल्हापूर, नाशिक, त्र्यंबकेश्वर, पैठण, देहू, आळंदी, जेजूरी आदी अनेक देवस्थाने, महाबळेश्वर, पाचगणी, माथेरान, खंडाळा, लोणावळा, चिखलदरा ही थंड हवेची ठिकाणे, कोयना, जायकवाडी, भाटघर, चांदोली इ. धरणे पर्यटन स्थळे म्हणून दिवसेंदिवस महत्त्वाची ठरत आहेत.

अभ्यास क्षेत्र / संशोधन क्षेत्र (Study Area):- critical

महाराष्ट्र राज्याच्या मराठवाडा विभागात साधारणपणे मध्यभागी परभणी जिल्हा आहे. परभणी जिल्हाचा विस्तार हा १८°.४५ ते २०°.०१ उत्तर अक्षवृत्त व १६°.१३ ते ७६°.५ पुर्व रेखावृत्तावर आहे. परभणी जिल्ह्याला एकूण पाच जिल्ह्याच्या सीमा लागलेल्या आहेत. यात नांदेड, जालना, लातूर, हिंगोली, बीड हे जिल्हे आहेत.

परभणी जिल्ह्यात एकूण ९ तालुक्यांचा समावेश होतो. यात परभणी, जिंतूर, सेलू, पाथरी, गंगाखेड, पालम, पुर्णा, सोनपेठ व मानवत हे तालुके आहेत. जिल्ह्यात सध्या एकूण ७०४ ग्रामपंचायती आहेत. जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ ६२१४ चौ. कि.मी. आहे. सन २०११ च्या जनगणनेनुसार परभणी जिल्ह्याची एकूण लोकसंख्या १८३६०८६ एवढी आहे. उपलब्ध माहितीनुसार जिल्ह्यातील साधारणतः ९ तालुके ग्रहित धरून जिल्ह्यातील पर्यटन स्थळांचा अभ्यास करण्यात येईल.

परभणीचे पुरातन नाव मुदगल जे प्रभावती देवीच्या नावावरून ‘प्रभावतीनगर’ व नंतर परभणी असे पडले.

परभणी जिल्हा संतांची भूमी म्हणून ओळखला जातो. संत जनाबाई थोर गणिती भास्करभट्ट व शिर्डीचे साईबाबा यांच्या जन्मभूमीचा जिल्हा आहे. गोदावरी नदीकाठी या जिल्ह्यात अनेक धार्मिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक व मनोरंजनात्मक असे प्रेक्षणीय पर्यटन स्थळे आहेत. गंगाखेड हे दक्षिणकाशी म्हणून ओळखले जाते. कारण येथे संत जनाबाई यांचे वास्तव्य व समाधी, तसेच शिवकालीन राजवाडा आहे. जिंतूर शहराच्या उत्तरेला ३ कि.मी. अंतरावर सुमारे ४०० वर्षापूर्वीचे प्राचीन जैन मंदिर आहे. परभणीपासून १९ कि.मी. दक्षिणेला पोखरणी येथे भगवान नृसिंहाचे प्राचीन मंदिर तसेच परभणी शहरात पाऱ्यापासून बनवलेले मृत्यूंजय पारदेश्वर मंदिर, मृदुगलेश्वर मंदिर, सय्यदशहा तुराब उल हक या थोर मुस्लिम संतांचा दर्गा, सोनपेठ तालुक्यातील शेळगाव येथे भगवान विष्णुचे प्रसिध्द पौराणिक मंदिर, पाथरी येथे साईबाबांची जन्मभूमी, राणी सावरगाव येथे गंगाखेडपासून १८ कि.मी. अंतरावर रेणुकामातेचे हेमांडपंथीय मंदिर, पाथरी तालुक्यातील कासापूरी (महादेव यात्रा) येथे एप्रिलमध्ये तीन दिवसीय यात्रा भरते. रूढी (ज्ञानेश्वर माऊली) येथे फेब्रुवारीत उत्सव भरतो, रामपूरी (रत्नेश्वर) उत्सव फेब्रुवारी, मार्चमध्ये भरतो. ढालेगाव येथे (सत्संग गीत भवन) व समर्थवेध विद्यालय आहे. गोडगाव येथील रेणुकादेवी यात्रा उत्सव प्रसिध्द आहे. गुंज येथे

गोगानंद महाराजांचे जागृत देवस्थान व दत्तधाम, नागठाणा येथे नागपंचमी उत्सव भरतो. सातेफळ येथील परतगंगा उत्सव, पुर्णा येथील गुरूबुध्द स्वामी उत्सव, पाच पांडवापैकी पार्थाने (अर्जुन) वसवलेले शहर पार्थपूर (सध्याचे पाथरी), सम्राट अशोकाच्या साम्राज्यातील गाव जैनपूर (सध्याचे जिंतूर), वाल्मिकी ऋषींच्या वास्तव्याने पावन झालेले शहर वालूर (सध्याचे सेलू), अगस्त ऋषींचा गोदावरी नदीकाठचे आश्रम हे धार्मिक पर्यटनाचे वैशिष्ट्ये आहे.

परभणीपासून १२ कि.मी. पुर्वेला तीन नद्यांच्या संगमावर त्रिधारा हे प्रेक्षणीय स्थळ, जिंतूर तालुक्यातील पुर्णा नदीवर येलदरी येथे छोटा जलविद्युत प्रकल्प तसेच पुर्णाजवळ पुर्णा नदीवर सिध्देश्वर धरण, मराठवाड्यातील एकमेव १९७२ मध्ये स्थापन झालेले प्रसिध्द असे कृषी विद्यापीठ व इतर विविध धार्मिक, सांस्कृतिक, पर्यटन स्थळे आहेत.

प्रस्तुत संशोधनात वरील स्थळांचा मागील वीस वर्षांचा सविस्तर अभ्यास करण्यात येणार आहे.

गृहितके (Hypothesis):-

१. पर्यटन स्थळांचा विकास भौगोलिक घटकांवर अवलंबून असतो.
२. पर्यटन स्थळांचा विकास व प्रशासकीय धोरण यांचा संबंध आहे.
३. संशोधन क्षेत्रातील पर्यटन स्थळांचा विकास व आर्थिक प्रगतीचा संबंध आहे.
४. पर्यटन स्थळांच्या विकासास संधी आहे.

उद्देश (Objectives):-

१. अभ्यास क्षेत्रातील पर्यटन स्थळावर परिणाम करणाऱ्या भौगोलिक घटकांचा अभ्यास करणे.
२. परभणी जिल्ह्यातील पर्यटन उद्योगाच्या (Tourism Industries) संधीचा शोध घेणे.
३. अभ्यास क्षेत्रातील वंचित पर्यटन स्थळांच्या विकासासाठी उपाययोजना सुचविणे.
४. संशोधन क्षेत्रातील पर्यटन स्थळांच्या विकासासाठी शासकीय योजना व निधी वाटपाचा अभ्यास करणे.
५. पर्यटन स्थळांच्या सेवा-सुविधेचा अभ्यास करणे.

संशोधन पध्दती (Research Mothodlogy):-

प्रस्तुत अभ्यास प्रामुख्याने प्राथमिक व द्वितीयक सामग्रीवर आधारलेला आहे. प्राथमिक माहितीमध्ये मार्गदर्शक (गाईड) कडून व प्रत्यक्ष स्थळांना भेटी देऊन माहिती गोळा केली जाईल. द्वितीयक सामग्री परभणी जिल्ह्यातील मागील १९९० ते २०१० या एकूण २० वर्षाच्या आर्थिक व सामाजिक समालोचनाच्या आधारे, विविध पर्यटन संदर्भग्रंथ, इंटरनेट, वेबसाइट, शासकीय अहवाल, पर्यटन खात्याकडून प्रकाशित होणारे अहवाले, मार्गदर्शक पुस्तके, तसेच जिल्हा नगर नियोजन कार्यालय, माहिती जनसंपर्क कार्यालयातून माहिती संकलित करून प्राथमिक व द्वितीय सामग्रीवर प्रक्रिया करून ती सांख्यकिय माहिती, नकाशे, आलेख व संशोधन क्षेत्रातील भौगोलिक घटकांचा सहसंबंध स्पष्ट करण्यासाठी सहसंबंधीय सांख्यकिय पध्दतीचा वापर करून दर्शविण्यात येईल. तसेच ही पर्यटनविषयक माहिती विविध पर्यटन नकाशे पध्दतीच्या सहाय्याने दर्शविण्यात येईल.

संशोधनाची व्याप्ती व मर्यादा:-

परभणी जिल्हा हा मराठवाड्यातील ०८ जिल्ह्यांपैकी साधारणत: मध्यभागी असलेला जिल्हा आहे. मराठवाड्यात या जिल्ह्याचे महत्त्वाचे स्थान आहे. या जिल्ह्यात एकूण ०९ तालुक्यांचा सामावेश होतो हे ०९ तालुके गृहीत धरूनच मागील सन १९९० ते २०१० या २० वर्षांच्या कालखंडामधीलच पर्यटन स्थळांचा अभ्यास प्रस्तुत संशोधनात करण्यात येईल.

प्रकरण नियोजन (Scheme of Chapters):-

प्रस्तुत अभ्यास क्षेत्राचे एकूण प्रमुख सहा प्रकरणात विभाजन करण्यात येईल.

प्रकरण १ ले.

- पर्यटनाची संकल्पना
- पर्यटनाचे महत्व
- भारतीय अर्थव्यवस्थेत पर्यटनाची भूमिका
- संशोधनाची गृहीतके
- अभ्यासक्षेत्र
- संशोधनाचा उद्देश

- संशोधन पध्दती व सांख्यिकिय माहिती
- संशोधन साहित्याचा आढावा

२. अभ्यास क्षेत्राची भौगोलिक पार्श्वभूमी

- अभ्यास क्षेत्राची थोडक्यात ऐतिहासिक पार्श्वभूमी
- परभणी जिल्ह्याचे स्थान, आकार व सिमा
- अभ्यास क्षेत्राची प्राकृतिक रचना
- अभ्यास क्षेत्रातील नदी प्रणाली
- अभ्यास क्षेत्रातील हवामान, मृदा प्रकार,
- अभ्यास क्षेत्रातील नैसर्गिक वनस्पती व जलसिंचन.

३. अभ्यास क्षेत्रातील लोकसंख्या विषयक घटकाचा अभ्यास

- अभ्यास क्षेत्रातील लोकसंख्येची वैशिष्ट्ये
- अभ्यास क्षेत्रातील लिंग गुणोत्तर प्रमाण
- अभ्यास क्षेत्रातील साक्षरता
- अभ्यास क्षेत्रातील जन्मदर- मृत्यूदर
- अभ्यास क्षेत्रातील लोकसंख्याचा सामाजिक, भौगोलिक व आर्थिक घटकावरील परिणाम अभ्यासणे.

४. परभणी जिल्ह्यातील पर्यटन स्थळांचा अभ्यास

- प्रस्तावना
- अभ्यास क्षेत्रातील पर्यटन स्थळांचे प्रकार
- अभ्यास क्षेत्रातील पर्यटनाची वैशिष्ट्ये
- अभ्यास क्षेत्रातील ऐतिहासिक पर्यटन स्थळे- किल्ले, मंदिरे
- अभ्यास क्षेत्रातील सांस्कृतिक पर्यटन स्थळे- समाध्या, उद्याने, बगीचे
- अभ्यास क्षेत्रातील धार्मिक पर्यटन स्थळे- मंदिरे, मस्जिदी, धाम, मठे

- अभ्यास क्षेत्रातील मनोरंजनात्मक पर्यटनस्थळे- अभय अरण्य, पिकनिक पॉइंट, धबधबे
- अभ्यास क्षेत्रातील इतर पर्यटन स्थळे

५. अभ्यास क्षेत्रातील पर्यटन (उद्योग) व्यवसायाचे परिणाम

- प्रस्तावना
- अभ्यास क्षेत्रातील पर्यटन स्थळांचा सामाजिक, आर्थिक व धार्मिक घटकावर होणारा परिणाम
- अभ्यास क्षेत्रातील पर्यटनातुन मिळणारा रोजगार
- अभ्यास क्षेत्रातील पर्यटन उद्योगाचा इतर व्यवसायावर होणारा परिणाम
- अभ्यास क्षेत्रातील पर्यटन व मनोरंजन
- अभ्यास क्षेत्रातील लोकसंख्येवर व सांस्कृतिक चालीरितीवर होणारा परिणाम
- अभ्यास क्षेत्रातील पर्यटन स्थळावर होणारा भौगोलिक, सामाजिक व सांस्कृतिक परिणाम

६. निष्कर्ष व शिफारशी

<u>संशोधन साहित्याचा आढावा (सर्वे ऑफ लिट्रेचर):-</u>

१. **सत्यामुर्ती के.** -पॉलिटीकल जॉग्राफी ऑफ इंडिया- प्रटीक्वेल्स पब्लिशेर्स- जयपूर १९९०

२. **ॲलेक्झांडर. जे. डब्ल्यु, जीस्वन एल.जी. (१९७९)**-इकॉनॉमिक जॉग्राफी-नवी दिल्ली- ११० ००१.

३. **करमकर, प्र.र, गुप्ते श्री.च.परांजपे. श.द. (१९७६)-** आर्थिक व व्यापारी भूगोल कॅन्टिनेटल प्रकाशन, पुणे.

४. **अथेन्स, आर.ए., पानोफास्के, एच.ए. चाहीर, जे.जे.च.रोगो अल्बर्ट (१९७८)**-४ ॲडमॉस्पीअर, चोर्ले ३, मेरेली पब्लिकेशन कंपनी- कोलंबस.ओही- ४३२७६.

५. **बुर्गेस इ. डब्ल्यु १९२५**-द ग्रोथ ऑफ सिटी:ॲन इन्टरडक्टन ऑफ द रिसर्च प्रोजेक्ट इन.आर.ई. पार्क व इ. डब्ल्यु बुर्गेस- द सिटी.४७ (शिकागो).

६. **चुनिघंम डब्ल्यु. पी., कॉपर टी.एच. घोरम इ. व माल्कोम टी -१९९९-** इनव्हायरमेन्टल इन सॉयक्लोपिडिया, २nd इडिशन, जायको पब्लिशिंग हाऊस मुंबई, पे.नं. १११५-११२०.

७. **डिपार्टमेन्ट ऑफ इनव्हायरमेन्ट १९८७** - हॅन्डलींग जॉग्राफिकल इन्फॉरमेशन. रिपोर्ट ऑफ द कमिटी ऑफ इनक्वायरी, चॉरेडी बाय लॉर्ड चार्ले, एच.एम. ३०, लंडन.

८. **मुद्राकर्ता एस. (१९९९) -** स्टेटस ॲण्ड पॉलिसी फार्मवर्क ऑफ ग्रांऊड वाटर इन इंडिया- अहमदाबाद, विक्साट.

९. **ओबेर्ग एल. २००२**-कल्चरल शॉक द प्राब्लेम ऑफ ॲडजेसमेन्ट टू न्यु कल्चरल इनव्हारमेन्टस-(टेकन फ्रॉम इंटरनेट, वर्ल्डवाईड क्लासरूम).

१०. **रहीन्द डी. डब्ल्यु (९७७)-** कॉम्प्युटर ॲडेड कार्टोग्राफी ट्रान्सकेक्शन ऑफ द इंस्ट्युट्युट ऑफ ब्रिटीश जॉग्राफरस, पे.नं. ७१- ९७.

११. **त्रिवेदी पि.आर. व आर गुरूदिप १९९५-** इनसायक्लोपिडिया ऑफ इनव्हायरमेन्टल सायन्सेस, व्ही. १६, आकाशदिप पब्लिशिंग हाऊस, न्यु दिल्ली. पे.नं. १, १४ व २३८-२८२.

१२. **गऊनिपा शि. १९९८-** कल्चर शॉक (टेकन फॉर्म इंटरनेट), डिपार्टमेन्ट ऑफ कैंन्सलींग & स्कूल सायकॉलॉजी, सन दिगो स्टेट युनिव्हरसिटी.

संदर्भ ग्रंथसूची:-

१. भाट्रा जी.एस. (१९९६) - टुरिजम इन द २१ सेंच्युंरी

२. खतीब ए.के. - पर्यटन भूगोल

३. कुलकर्णी दत्ता - महाराष्ट्रातील पर्यटनस्थळे

४. शिंदे एस.बी. (१९९७) - पर्यटन भूगोल

५. भाटिया ए.के. - टुरिजम डेव्हल्पमेन्ट.

६. दास्ताने संतोष - महाराष्ट्र २०००

७. डोनाल्ड इ. एन. (१९८०) - टुरिजम प्लॅनिंग ॲण्ड डेव्हलमेन्ट इश्यु

८. रॉबीन्सन आर. - द जॉग्राफी ऑफ टुरिजम

९.	कृष्णन के. मोहिनंदरचंद कामरा	-	बेसिक ऑफ टुरिजम
९.	भागवत, अ.वि., सौ. जोशी मेघा	-	पर्यटन भूगोल
१०.	वहाब, सल्लाह (१९७५)	-	टुरिजम मॅनेजमेन्ट
११.	सिंह रत्नदिप	-	टुरिजम टुडे Vol. ०१.
१२.	डॉ. विठ्ठल घारपुरे (१९९९)	-	सामाजिक व सांस्कृतिक भूगोल
१३.	शेठ, पर्णनाथ	-	सक्सेसफुल टुरिजम मॅनेजमेन्ट
१४.	समर्थ उद्योग प्रकाशन	-	पर्यटन ॲटलास, भारत
१५.	टूरिजम रिसर्च प्लॅनिंग डेव्हल्पमेन्ट	-	रोमिला चावला
१६.	टूरिजम ॲण्ड बायोडायर्व्हसिटी	-	रोमिला चावला

शासकीय पुस्तके/ मासिके:-

१. योजना मासिक	-	महाराष्ट्र शासन- प्रकाशन
२. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ	-	माहितीपत्रके
३. महाराष्ट्र राज्य वन विभाग	-	माहिती पुस्तीका
४. टूरिजम सर्वे	-	स्टेट ऑफ महाराष्ट्रा, फायनल रिपोर्ट मिनिस्ट्री ऑफ इंडिया
५. NET Website.		
६. मिनिस्ट्री ऑफ टूरिझम	-	गर्व्हमेन्ट ऑफ इंडिया.
७. अर्थ व सांख्यिकीय कार्यालय	-	परभणी जिल्हा.
८. नगर नियोजन कार्यालय	-	परभणी जिल्हा.

संशोधक मार्गदर्शक
डॉ. शिंदे सुनिता शंकरराव
(एम.ए.एम.फील. पीएच.डी.)
भूगोल विभागप्रमुख,
श्रीमती सुशीलादेवी देशमुख,
महिला महाविद्यालय, लातूर ता.जि. लातूर.

संशोधक
शिंदे दत्ता राधाकिसन
(एम.ए.एम.एड्. एम.फिल)